(२३)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण


४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९,
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.


जावक क्र.मजीप्रा/सस/तांशा–1/350/ 128 दिनांक : 11/1/1999

**// परिपत्रक //** क्रमांक – ७

विषय :– पूर्व अर्हता ठरविण्याच्या पध्दती बाबत.

संदर्भ :– 1) या कार्यालयाचे दि. 3/3/98 चे परिपत्रक क्र.मजीप्रा/सस/तांशा–1/333

2) या कार्यालयाचे दि.8/5/98 चे इंग्रजी परिपत्रक क्र.MJP/MS/TS-I/1370

वरील संदर्भातील दि.3/2/98 च्या परिपत्रकाव्दारे कंत्राटदारांची पूर्वअर्हता ठरविणे व त्यांची निविदांची किंमत ( **Bid Capacity** ) ठरविण्याची पध्दत फक्त रु. 3.00 कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या कामाबाबत लागू करण्यांत यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच संदर्भातील दिनांक 8/5/98 च्या परिपत्रकाव्दारे पूर्वअर्हता कशी ठरविण्यांत यावी याबाबतचे सूत्र देण्यांत आले असून याबाबतचे कलम सर्व कामांच्या निविदेमध्ये समाविष्ट करण्यांत यावे असे निर्देशित केले आहे.

वरील दोन्हीही परिपत्रके पूर्वअर्हता ठरविण्यासंबंधी असून रु. 3.00 कोटी पेक्षा कमी किंमतीच्या निविदांसाठी **Bid Capacity** चे कलम लागू करावयाचे किंवा कसे तसेच **Bid capacity** तपासण्याची आवश्यकता याबाबत ब–याचशा क्षेत्रीय अधिकारी व कंत्राटदारांनी विचारणा केली आहे. यासंदर्भात आढावा घेण्यात येवून याबाबत खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे.

रु. 300/– लाखा पर्यंतच्या निविदांसाठी दि. 3/2/98 च्या परिपत्रकांत कळविल्यानुसार पूर्व अर्हता ( **Pre-qualifilcation** ) व **Bid Capacity** तपासण्याची गरज नाही.दि. 8/5/98 च्या परिपत्रकानुसार **Bid Capacity** काढण्यासाठी कळविण्यांत आलेले सूत्र ज्या कामांची किंमत रु.300/– लाखापेक्षा जास्त आहे अशा कामासाठी इच्छूक कंत्राटदाराची पूर्व अर्हता ठरविण्यासाठी वापरण्यांत यावे. या अनुषंगाने **Bid Capacity** बाबतचे कलम फक्त रु. 300/– लाखापेक्षा जास्त किंमतीच्या निविदांमध्येच समाष्टि करण्यांत यावे.

वरील स्पष्टीकरण आपल्या अखत्यारीतील सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून दयावे.

राजेंद्र सगणे
( राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत
अपर मुख्य सचिव, पा.पु.व स्व.विभाग मंत्रालय, मुंबई.
सर्व मुख्य अभियंता
सर्व अधीक्षक अभियंता
सर्व कार्यकारी अभियंता